**शासकीय संदेश प्रसार नियमावली-२०१८**
**सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : मावज-२०१९/प्र.क्र.२३५/का-३४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १७ सप्टेंबर, २०१९

वाचा: १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : मावज-२०१९/प्र.क्र.३४८/का-३४, दिनांक : २० डिसेंबर, २०१८
२) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.वृत्तचित्र-२०१९/शा.सं.प्र.नि./का-५/२४७६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१९

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र शासनामार्फत वृत्तपत्रांना / नियतकालिकांना देण्यात येणाऱ्या वर्गीकृत व दर्शनी जाहिरातीच्या वितरण धोरणाची नियमावली तयार करुन गेल्या १५ वर्षांच्या काळात जाहिरात क्षेत्रात झालेल्या बदलाच्या अनुषंगाने वेळोवेळी नवीन नियम जाहीर करण्यात आलेले आहेत.जाहिरात क्षेत्रातील बदल व सोशल मिडीयासह उदयाला आलेली नवीन प्रसारमाध्यमे लक्षात घेता शासकीय संदेश प्रसार नियमावली-२०१८ निर्गमित करण्यात आली आहे. सदर नियमावली निर्गमित झाल्यानंतर महाराष्ट्र राज्यातील छोट्या वृत्तपत्रांचे संपादक व पत्रकार सेवा संघ, महाराष्ट्र, मुंबई व इतर संघटनांनी विविध मागण्या, हरकती, दुरुस्ती व सूचना सादर करण्यात आलेल्या आहेत. या हरकती व सूचनांबाबत सकारात्मक विचार करुन काही सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे शासनाने निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

शासकीय संदेश प्रसार नियमावली-२०१८ मधील तरतूद व सुधारणा खालीलप्रमाणे आहेत.

| क्र. | नियम क्रमांक | शासन निर्णयातील तरतूद | सुधारणा |
|---|---|---|---|
| १ | ४.४.३ | दैनिकासाठी ७६०० चौ.से.मी. | १. दैनिके - ६४०० चौ.से.मी.<br>२. ट्यॅब्युलाईड दैनिके- ६६२४ चौ.से.मी. |
| | ४.४.४ | साप्ताहिकासाठी ३५०० चौ.से.मी. | साप्ताहिके - ३३१२ चौ.से.मी. |
| २ | ४.३.२ | वृत्तपत्रांची पडताळणी प्रत्येक वर्षाला केली जाईल. | दर दोन वर्षांनी वृत्तपत्रांची पडताळणी करण्यात येईल. |
| ३ | ४.५.२ | नव्या दराचे कोष्टक खपानुसार अंमलात येईल. (परराज्यातून प्रकाशित होणाऱ्या मराठी भाषेतील नियतकालिकांसाठी दर ठरविण्यात आलेले नाही.) | **सदर मजकुरानंतर देण्यात आलेल्या तक्त्यानंतर खालील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे:-**<br>"दिल्लीसारख्या राजधानीच्या शहरात मराठी वृत्तपत्र चालविणे व्यवहारिकदृष्ट्या कठीण असले तरी तेथील मराठी जनतेसाठी मराठी वृत्तपत्र हे महत्त्वाचे माध्यम आहे. देशाच्या राजधानी दिल्लीमधून प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांना / |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मराठी वृत्तपत्रांना प्रोत्साहन देण्यासाठी दर कोष्टकानुसार खपाच्या आधारे येणाऱ्या अंतिम दराच्या ३००% वाढ देण्यात येईल. (उदा.रु.१० मूळ दर येत असल्यास रु.३० इतका अतिरिक्त दर होईल)” |
| ४ | ४.३.४ | नियमामधील दुसऱ्या ओळीत “(परिशिष्ट ब)” | “(परिशिष्ट आ)” |
| ५ | ४.३.८ | मान्यताप्राप्त यादीतील वृत्तपत्र/ नियतकालिकांचे अंक त्यांच्या ठराविक नियत तारखांनाच प्रसिद्ध होणे आवश्यक आहे. एका वर्षात किमान अंक प्रकाशनाची संख्या खालीलप्रमाणे आवश्यक आहे.<br>१. दैनिकांच्या बाबतीत वर्षातून किमान ३०० अंक<br>२. सांय दैनिकांच्या बाबतीत वर्षातून किमान २८० अंक<br>३. साप्ताहिकांच्या बाबतीत वर्षातून किमान ४६ अंक<br>४.अर्धसाप्ताहिक/द्विसाप्ताहिकाच्या बाबतीत वर्षातून किमान ८० अंक | **<u>सदर मजकुरानंतर खालील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :-</u>**<br>समान मजकूर केवळ वृत्तपत्राचे नाव बदलून किंवा प्रकाशनाची तारीख बदलून छापत असल्यास या नियतकालिकांचा अर्ज फेटाळण्यात येईल. तसेच एकाच कुटुंबाच्या मालकीची जास्तीत जास्त दोनच वृत्तपत्रे जाहिरात मागणीसाठी ग्राह्य समजण्यात येतील. काही दैनिकांच्या आठवड्यातून एकदा विशेषत: रविवार व इतर दिवशी दैनिकाचे स्वरुप कायम ठेवून वेगळ्या नोंदणीने अंक प्रकाशित केले जातात. तांत्रिकदृष्ट्या केवळ नोंदणी क्रमांक वेगळा असल्याने त्या दैनिकाचे हे अंक साप्ताहिक म्हणून गणले जाऊ शकतात. तथापि, अशा दैनिकांच्या बाबतीत, ज्या दिवशी त्या शिर्षकाचा वेगळा नोंदणी क्रमांक असलेली नियतकालिके मूळ दैनिकाप्रमाणेच प्रकाशित होत असल्यास त्या अंकासाठी मूळ दैनिकाप्रमाणेच दर गृहीत धरुन ते जाहिरात वितरणासाठी पात्र ठरतील. |
| ६ | ४.६.२ | महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ http:// mahatender.gov.in | महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in अथवा शासनमान्य संकेतस्थळ |
| ७ | ४.६.५ | अ.क्र.२<br>संबंधित जिल्ह्यातील मध्यम संवर्गातील एक दैनिक व मध्यम संवर्गातील साप्ताहिक (संबंधित जिल्ह्यात मध्यम संवर्गातील दैनिक व साप्ताहिक नसल्यास अपवादात्मक परिस्थितीत त्या विभागातील अन्य जिल्ह्यातील दैनिक / साप्ताहिक) | **अ.क्र.२**<br>जाहिरात प्रसिद्धीचे वृत्तपत्र यामध्ये मध्यम संवर्गातील एक दैनिक, एक साप्ताहिक किंवा लघु संवर्गातील एक साप्ताहिक. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | ४.६.८ | मान्यताप्राप्त यादीवरील व यादीबाहेरील नियतकालिकांना आणि स्मरणिका किंवा ग्रंथ यात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातींकरिता ही बाब लागू असेल. | **सदर मजकुरानंतर खालील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :-** “त्यापेक्षा अधिक मूल्याचे प्रस्ताव शासनाकडे पाठविणे बंधनकारक राहील.” |
| ९ | ४.९.८ | तांत्रिक समिती<br>अ.क्र.८ वरिष्ठ सहायक संचालक (जाहिरात), मा.व ज. | अ.क्र.८<br>वरिष्ठ सहायक संचालक (वृत्तचित्र), मा.व ज. |
| १० | ४.९.३ | इ) ईएमसीसी प्रमाणपत्र | इ) ईएमएमसी (EMMC) प्रमाणपत्र |
| ११ | ४.११ | शासन निर्णय क्र.-२०१५प्र३४/ १५३क्र.दिनांक जुलै २०१७ | शासन निर्णय, मावज २०१५/प्र.क्र.३५०/३४, दि.१९/१०/२०१५ |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०९१७१६२६५५७२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2019.09.17 16:38:54 +05'30'

**( रा.ना.मुसळे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

संचालक (माहिती)(प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

**प्रत,**

१) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद/ महाराष्ट्र विधानसभा, मुंबई
२) सर्व सन्माननीय सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद/ महाराष्ट्र विधानसभा, मुंबई
३) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४) सचिव (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
५) महासंचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा व अनुश्रेयता), मुंबई/ नागपूर,
७) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
८) सर्व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
९) उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१०) सर्व विभागीय उपसंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
११) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१२) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१३) सर्व जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
१४) सर्व उप माहिती कार्यालये, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,

१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१६) लेखाधिकारी (आहरणा व संवितरण), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१७) नियोजन विभाग / (का-१४४३), मंत्रालय, मुंबई
१८) वित्त विभाग / (व्यय-४), मंत्रालय, मुंबई
१९) निवड नस्ती.